## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### परिपत्रक

**संदर्भ -** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ९७.

दि.०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ लागू झाला आहे, हे आपणास विदीत आहेच. सदरचा अधिनियम शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावरही उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर अधिनियमामधील कलम ९७ नुसार प्रत्येक संलग्न, स्वायत्त, अधिकारप्रदान स्वायत्त महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी स्वतंत्र महाविद्यालय विकास समिती गठीत करावयाची आहे. सदर समितीचे गठण, समितीचा कालावधी, प्रतिवर्षी घ्यावयाच्या बैठका तसेच कार्यक्षेत्र याबाबत " महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ९७ " मध्ये विस्तृत माहिती देण्यात आंली आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ९७ मध्ये नमुद केल्यानुसार **महाविद्यालय विकास समिती - College Development Committee** गठीत करावी. सदरची समिती गठीत केल्यानंतर गठीत समिती सदस्यांची नावे विद्यापीठ कार्यालयास कळवावीत. तसेच ३० जून रोजी संपणा-या प्रत्येक वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करून तो महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास तसेच विद्यापीठास सादर करावा. उपरोक्त नमुद केल्यानुसार सदर समिती गठणाची कार्यवाही तात्काळ करावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/ 233
दि. 30 MAR 2017

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.